# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

### प्रवास आणि अभ्यास दोन्हीसाठी मेट्रो ठरते आहे उपयोगी

### भविष्यातील प्रगतीसाठी माहितीचे उत्तम माध्यम म्हणून विद्यार्थीप्रिय ठरते आहे मेट्रो



नागपूर : शहरात मेट्रो सुरु झाल्यापासून अनेक प्रकारे नागरिकांना मेट्रोचा उपयोग होतो आहे. दिवसेंदिवस मेट्रो प्रवाश्यांची संख्या वाढत जात आहे. प्रवासाव्यतिरिक्त देखील मेट्रोचे अनेक फायदे आहेत. त्यातील सर्वाधिक फायदे विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरत आहे. महा कार्डच्या माध्यमाने प्रवास करणाऱ्यांना १०% तर विद्यार्थ्यांना प्रवासावर ३०% सवलत असल्याने प्रवासासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती मेट्रो झाली आहे. याशिवाय इंडस्ट्रियल व्हिझिट, एज्युकेशनल व्हिझिट किंवा ट्रिप

ऑन व्हीलच्या माध्यमाने विद्यार्थ्यांना मेट्रो भवन, मेट्रो स्टेशन किंवा धावत्या मेट्रोत जाणे आवडू लागले आहे. गेल्या महिन्यात मेट्रो भवन येथे अनेक महाविद्यालयांनी अभ्यासात्मक दौरा केला. यात इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर, एन्व्हॉर्नमेंट आणि बिझिनेस मॅनेजमेंटचे विद्यार्थी आहेत, तर शहरातील आणि शहराबाहेरील आजूबाजूच्या ग्रामीण क्षेत्रातील अनेक शाळांनी धावत्या मेट्रोमध्ये विद्यार्थ्यांची पिकनिक करण्यास पसंती दिली. शिवाय मेट्रोचे अधिकारी वेगवेगळ्या महाविद्यालयांना भेट देऊन त्यांना मेट्रो संवाद या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना सार्वजनिक वाहतूक, त्याचे फायदे, मल्टी मॉडेल इंटिग्रेशन, पर्यावरण पूरक वाहतूक प्रणालीचे महत्व अशा विविध विषयांवर माहिती देत असतात.

मेट्रो भवनमध्ये तसेच बांधकाम स्थळांवर आणि मेट्रो स्टेशनच्या इमारतींचे स्थापत्य समजून घेण्याच्या दृष्टीने आजवर नागपुरातील अनेक अभियांत्रिकी विद्यालयांनी तसेच आर्किटेक्चर महाविद्यालयांनी भेट दिल्या आहेत. यावेळी मेट्रो प्रकल्पातील संबंधित अधिकाऱ्यांनी, अभियंत्यांनी विद्यार्थ्यांच्या विषयाशी संबंधित माहितीच दिली नाही तर त्यांना प्रत्यक्ष स्थळांची पाहणी करण्यास परवानगी देऊन, प्रात्यक्षिके किंवा व्हिडीओ, पीपीटी सादरीकरणामार्फत प्रत्यक्ष प्रॅक्टिकल ज्ञान प्रदान केले. सेलिब्रेशन ऑन व्हालीच्या माध्यमाने आजवर भंडारा, गोंदिया, सावनेर, अमरावती, रामटेक, अशा नागपुरेतर प्रांतातून शालेय विद्यार्थ्यांना मेट्रोत बसण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला आहे. आजवर हजारो विद्यार्थ्यांनी उंच पुलावरून धावणाऱ्या मेट्रोत बसण्याचा पहिल्यांदाच अनुभव घेतल्याने, मेट्रोत बसने म्हणजे विमानात बसण्यासारखे आहे असा अनुभव त्यांनी बोलून दाखवला. सेलिब्रेशन ऑन व्हील या उपक्रमांतर्गत आजवर एकूण ९०  ट्रिप ऑन व्हील झाल्या असल्याची माहिती देण्यात आली आहे.

याशिवाय विविध विद्यार्थी मेट्रोशी संबंधित प्रोजेक्ट किंवा असाइनमेंट घेऊन त्यावर अभ्यासात्मक सादरीकरण तयार करत असतात त्यासाठी नियमित मेट्रो भवन या मेट्रोच्या कार्यालयाला भेट देऊन ते त्यांच्या प्रोजेक्टशी संबंधित माहिती, त्यांच्या विषयाशी संबंधित डिपार्टमेन्टकडून घेत असतात. या माहितीच्या आधारे अनेक उपयुक्त प्रोजेक्ट तयार केले जात आहे. याशिवाय नागपूर मेट्रो प्रकल्पातील विविध डिपार्टमेंटजवळ इंटर्नशिप करण्यासाठी विद्यार्थी येतात. एक ते सहा महिन्यांच्या कालावधीसाठी ही इंटर्नशिप केली जात असून, या माध्यमाने विद्यार्थी प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेऊ शकतात, ज्याचा उपयोग पुढे त्यांच्या नोकरीतील प्रगतीसाठी होत असतो.

केवळ प्रवासासाठी नव्हे तर अभ्यासासाठी आणि भविष्यातील प्रगतीसाठी माहितीचे उत्तम माध्यम म्हणून नागपुरातील माझी मेट्रो विद्यार्थीप्रिय ठरते आहे.